या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकः राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार २४ जुले २०२४ | अंक २२७ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

# प्रकाश आंबेडकरांची मोठी खेळी, भुजबळांना ओबीसी यात्रेचं निमंत्रण, जरांगे पाटील काय भूमिका घेणार?



राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये संघर्ष सुरू असलेला पाहायला मिळत आहे. मराठा समाजाचे नेतृत्त्व करणारे मनोज जरांगे हे 20 जुलैपासून उपोषणाल बसले आहेत. उपोषणाचा दिसरा दिवस आहे. सगेसोयऱ्यांच्या मागणीवर ते ठाम आहेत. तर दुसरीकडे ओबीसी नेते याचा कडाडून विरोध करत आहेत. अशातच वंचित बहुजन आघाडीच्या प्रकाश आंबेडकर यांनी मोठी खेळी केली आहे. राज्यात जेव्हा मराठा आणि ओबीसी समाजाकडून आंदोलन सुरू असताना आंदोलनाच्या ठिकाणी त्यांनी भेट दिली होती. मात्र आता प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी बचाव यात्रा काढण्याचं जाहीर केलं आहे. विशेष म्हणजे या यात्रेला आंबेडकरांनी मंत्री छगन भुजबळ यांना निमंत्रण दिलं आहे. ओबीसी आरक्षण बचाव यात्रा २५ जुलैला चैत्यभूमी, मुंबई येथून सुरू होणार असून त्याच दिवशी पुण्यातील महात्मा फुले वाड्यालाही भेट देण्यात येणार आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यातून ही यात्रा जाणार आहे. तसेच, ओबीसी आरक्षण बचाव यात्रेत सहभागी होणाऱ्यासाठी ओबीसी आंदोलकांसह, महाराष्ट्रातील काही बड्या नेत्यांनाही निमंत्रण पाठवण्यात येणार असल्याची माहिती आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा चिघळला होता, मनोज जरांगे यांनी चलो मुंबईचा नारा देत मराठा समाजासह मुंबईच्या दिशेने निघाले होते. त्यावेळी ओबीसी समाजाकडून छगन भुजबळ यांनी विरोध करत जरांगे यांच्यावर टीका केलेली. दोघांमध्ये वाकयुद्ध सुरू होतं, दोघेही एकमेकांवर एकेरी भाषेत बोलत खोचक अशा टीका करत होते ज्या अजुनही सुरू आहेत. मराठा समाजाला आरक्षण द्या पण ओबीसींमधून न देता वेगळे द्या आमचा त्याला विरोध नसल्याची छगन भुजबळ यांची भूमिका आहे. पण आता मराठा समाजाला सगेसोयऱ्यांची मागणीसाठी जरांगे माघार घ्यायला तयार नाहीत. त्यामुळे आता वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. छगन भुजबळ यांनी शरद पवार यांची भेट घेत यामध्ये मध्यस्थी करण्याची विनंती केली. आम्हाला विचारून तुम्ही त्यांना वचने दिली नसल्याचं पवार स्पष्ट म्हणाले. परंतु पवारांची मनधरणी करण्यात राज्य सरकारला यश आलं असून सर्वपक्षीय बैठक घेणार असल्याची माहिती समोर आली आहे. या बैठकीला शरद पवारही उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

यादरम्यान प्रकाश आंबेडकर यांनी राज्यात काढणाऱ्या ओबीसी यात्रेचं छगन भुजबळ यांना निमंत्रण दिलं आहे. त्यामुळे मनोज जरांगे एकटे पडणार की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. आता जरांगे हे काय भूमिका घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## हारीबाई सोनवणे यांचे निधन



केज/प्रतिनिध तालुक्यातील सारणी येथील जेष्ठ महिला हारीबाई विठ्ठलराव सोनवणे वय ९० यांचे मंगळवार रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. सारणी येथील शेतात सोमवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कष्टकरी, मनमिळावू स्वभावाच्या हरीबाईंनी पतीच्या निधनानंतर संघर्षातून मुलांना शिकवले. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.मुलगा उद्योजक बजरंग,महादेव,माजी सैनिक जनार्धन ,सदाशिव सोनवणे यांच्या त्या मातोश्री होत.

## परळी-झिरेवाडी मार्गावरील अतिक्रमणे हटवा-अँड.मनोज संकाये व राहुल कांदे

**परळी वैजनाथ/प्रतिनिधी**

परळी जिरेवाडी मार्ग ते बायपास पर्यंत मार्गावरील अतिक्रमणे संबंधित विभागाने लक्ष देऊन हटवावीत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये व जिरेवाडीचे उपसरपंच राहुल कांदे यांनी केली आहे.

श्रावण महिना हा हिंदूचा पवित्र महिना असून या महिन्यांमध्ये प्रभु वैद्यनाथाचे दर्शन घेऊन हजारो भाविक जिरेवाडी येथील प्रसिद्ध देवस्थाना असलेले श्री सोमेश्वर महाराज यांचे दर्शन घेण्यासाठी जातात. या मार्गावर अतिक्रमणाने वेडा घातला असून याचा भाविक भक्तासह वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. याच मार्गावर असलेल्या नदीच्या ठिकाणी झाडांनी वेडा घातला असून त्यामुळे समोरचे वाहन वाहनधारकांना दिसत नाही. त्या जागी अपघाताचे प्रमाण वाढले



आहे. त्याच ठिकाणी नेहमी अपघात होत असतात. काही जणांचा हातपाय मोडल्याचे उदाहरणे आहेत. सदरील रस्ता हा नगरपालिका प्रशासनाच्या हद्दीमध्ये येत असल्यामुळे या मार्गावरील अतिक्रमणे तसेच झाडांचा वेडा प्रशासनाने काढून घ्यावा या कामांमध्ये मुख्याधिकारी साहेबांनी लक्ष द्यावे अशी विनंती प्रशासनाकडे केली आहे. अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी या मार्गावरील अतिक्रमणे काढून घ्यावित आणि झाडांचा वेढा काढावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ऐकतावादी रिपाई चा भव्य कार्यकर्ता संवाद मेळावा चोरंबा येथे संपन्न

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधार देशाला मजबूत व अधिक विकसित करू शकते - शैलेंद्र पोटभरे

**बीड /प्रतिनिधी**

चोरंबा तालुका धारूर येथे बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे यांच्या उपस्थितीत रिपाई एकतावाचा कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया एकतावादीचा धारूर तालुका कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजन केले होते. या मेळाव्यास प्रमुख उद्घाटक म्हणून रिपाई बीड जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र पोटभरे हे उपस्थित होते. या मेळाव्यास आपले विचार व्यक्त करताना पोटभरे म्हणाले की,परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेला



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे ध्येय धोरण आणि विचार घराघरांमध्ये गावोगावी पोहोचण्याचं काम रिपाई च्या कार्यकर्त्यांनी केलं पाहिजे आपल्या समाजाचे अनेक मूलभूत प्रश्न तसेच रखडलेले असून या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी येणाऱ्या काळामध्ये आपल्याला व्यापक लढा उभा करावा लागेल या साठी सर्व समाज बांधवांनी आपसातील मतभेद बाजूला ठेवून संघटित होणे गरजेचे आहे. आज तयागत आपल्या समाजाचे अनेक मूलभूत प्रश्न आहेत त्या प्रश्नाचे सोडवून केल्याशिवाय आम्ही स्वस्त बसणार नाहीत असा विश्वास समाजाला त्यांनी या मेळाव्या प्रसंगी दिला या वेळी रिपाईच्या शाखेचे नाम फलकाचे अनावरण त्यांच्या हस्ते करण्यात आले धारूर तालुक्यात गाव तिथे रिपाईची शाखा स्थापन झाली पाहिजे असे ते म्हणाले, या कार्यक्रमास बीड जिल्हा ऊसतोड मजूर संघटनेचे युवा अध्यक्ष मनोज जोगदंड बीड जिल्हा उपाध्यक्ष डी एस तूपसमुद्र परळी तालुका अध्यक्ष संजय भद्रे धारूर ता.कार्याध्यक्ष आबासाहेब जावळे केज ता.युवा अध्यक्ष अक्षय कांबळे अंबाजोगाई ता. युवा अध्यक्ष आदित्य जोगदंड परळी तालुका युवा अध्यक्ष विनोद घुमरे परळी ता. उपाध्यक्ष सुनील भाऊ कांबळे परळी ता कार्याध्यक्ष एकनाथ उजगरे किरण शिंदे साहेबराव शिंदे या मेळाव्याचे आयोजन धारूर युवा ता.कार्याध्यक्ष संतोष जावळे यांनी केले होते या कार्यक्रमास तालुक्यातील बहुसंख्ये

## नबापूर येथील जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समितीच्या बिनविरोध अध्यक्षपदी गोरख बाबर यांची निवड



**बीड प्रतिनिधी.अंकुश गवळी** बीड तालुक्यातील नबापूर येथील जिल्हा परिषद शालेय व्यवस्थापन समितीची निवडणूक पार पडली, यावेळी शालेय व्यवस्थापन समितीच्या बिनविरोध अध्यक्षपदी गोरख बाबर यांची निवड करण्यात आली, यावेळी निवडणूक प्रक्रिया दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक तोगे सर. शिक्षक भोसले सर, अरुण नाना गायवळ, रवींद्र गायवळ ,अशोक बाप्पा गायवळ ,बाळासाहेब गायवळ, कैलास गायवळ बिभीषण गायवळ पांडुरंग गायवळ बलभीम बाबर ,दिनकर गायवळ ,व आधी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी अध्यक्ष गोरख बाबर यांनी म्हटले आहेत शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध राहणार असल्याचे म्हटले आहे.

## मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत नागरी सहकारी बँकांमध्ये खाती उघडण्यास मान्यता अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक महिलांना केवळ १००/- रुपयात त्यांची खाते उघडून देणार-राजकिशोर मोदी

अंबाजोगाई महाराष्ट्र शासनाने राज्यातील महिला भगिणीसाठी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना नुकतीच जाहीर केली आहे. या योजने अंतर्गत राज्यातील महिलांना दरमहा १५००/- रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी राज्यातील महिलांची सरकारी बँकेत खाते उघडण्यास एकच झुंबड उडत आहे. मात्र सरकारी बँका महिलांचे खाते उघडून घेण्यासाठी उदासीनता दाखवत सदर बँका महिलांना नाहक त्रास देत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यानें शासनाकडून सहकार आयुक्त कार्यालयाने नुकतेच नागरी सहकारी बँकांना देखील महिला भगिनींचे खाते उघडून घेण्यास मान्यता दिली आहे. सहकार आयुक्तांच्या मान्यतेच्या अनुषंगाने अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेच्या मुख्य शाखा (प्रशांत नगर, राज हॉटेलच्या बाजूस) यासह सर्व शाखांमध्ये केवळ १००/- रुपयात महिलांना त्यांची खाती उघडून दिली जाणार आहेत तेव्हा अंबाजोगाई शहर व परिसरातील त्याचबरोबर अन्य ठिकाणच्या सर्व अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या शाखेत महिला भगिनींनी आपली खाते उघडून घेऊन मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी तथा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे शासनाने राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्य, आरोग्य त्याचबरोबर पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्याची “मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजना”, लागू केलेली आहे. सदर शासन निर्णयान्वये राज्यातील महिलांसाठी त्यांना दरमहा रु.१५००/- इतकी रक्कम देण्याबाबत शासन योजना जाहिर केलेली आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यातील शासकीय बँका कमी पडू लागल्या आहेत. पर्यायाने राज्यात विविध नागरी सहकारी बँकाच्या शाखा राज्यभर असल्याने या बँकांमध्ये सदर योजनेचे खाते उघडल्यास



महिलांना मदत होणार आहे. हीच बाब विचारात घेऊन, “मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना” या शासन योजने अंतर्गत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांनूसार नागरी सहकारी बँकांमध्ये खाती उघडण्यात यावीत अशा शासन मान्यतेचे पत्र नुकतेच दि१९/७/२०२४ रोजी शासनाच्या सहकार आयुक्त कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले आहे याच शासकीय मान्यता पत्राच्या अनुषंगाने अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक लि. अंबाजोगाई ही बँक महिलांना कसलाही नाहक त्रास न होऊ देता केवळ १००/- रुपयात त्यांचे खाते उघडून देणार आहे. बँकेच्या चौसळकर कॉलनी, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील शाखेत तसेच जोगाईवाडी येथील शाखेत केवळ १००/- रुपयात आपली खाती उघडून घ्यावीत असे आवाहन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी केले आहे. यापूर्वीही अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या रौप्य महोत्सवी वर्षामुळे अंबाजोगाई परिसरातील महिलांना बँकिंग क्षेत्राविषयी माहिती व्हावी म्हणून महिलांच्या साठी बँकिंग प्रशिक्षण शिबिराचे अयोजन करण्यात आले होते. त्याच बरोबर कोव्हिडं काळात देखील सामाजिक सेवाभाव म्हणून महिलांच्या साठी १००/- रुपयात त्यांची खाती सुरू करण्यात आली होती

# महाराष्ट्रातील २८८ विधानसभा आम आदमी पार्टी स्वबळावर लढणार

## अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी बीड यांचा सर्व विधानसभा चाचपणी दौरा

बीड. आम आदमी पार्टी च्या कार्यकर्त्यांनी इंडिया आघाडी सोबत महाराष्ट्रामध्ये नव्हे तर देशामध्ये कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी जिवापाड काम केले परंतु महाराष्ट्रातील इंडिया आघाडीच्या सहकार्याने आम आदमी पार्टीला विधानसभेला कसलाही प्रकारचा विचार न करता निवडणुका लढत आहे म्हणून आम आदमी पार्टी येणाऱ्या विधानसभेच्या महाराष्ट्रातील सर्व 288 जागा आपल्या ताकतीन लढवणार आहे यासाठी जिल्हाध्यक्ष माजी सैनिक अशोक येडे हे जिल्ह्यातील सर्व विधानसभा यांच्या मीटिंग घेऊन इच्छुक उमेदवार यांची चाचणी करण्यासाठी व समाजसेवेमध्ये विविध क्षेत्रात काम करणारे नागरिक यांनाही आम आदमी पार्टी निवडणूक लढवण्यासाठी प्रोत्साहित करणार आहे अशा लोकांना आमंत्रित करत आहे तरी या दौऱ्याच्या माध्यमाने



आपण सर्व भेट घेऊ शकता व आम आदमी पार्टीमध्ये सहभागी होऊ शकतात हा दौरा असा असेल की 1) परळी विधानसभा व केज/अंबाजोगाई विधानसभा संयुक्त बुधवार द. 02.00 मुकुंदराज कॉलनी नवा मोंढा आंबेजोगाई 2)25/07/24 माजलगाव विधानसभा गुरुवार स.11.00 हनुमान चौक हनुमान मंदिराच्या पाठीमागे माजलगाव 3) गेवराई विधानसभा दि.25/07/24 गुरुवार दु.02.00 शासकीय विश्रामगृह गेवराई 4) आष्टी पाटोदा शिरूर (कासार) विधानसभा गुरुवार दि.27/07/24 शनिवार सं.11:30 शासकीय विश्रामगृह आष्टी 5) बीड विधानसभा रविवार दि.28/07/24 सं.02.30 शासकीय विश्रामगृह बीड या ठिकाणी आयोजित केला आहे तरी सर्व विधानसभा तील कार्यकर्ते पदाधिकारी व इच्छुक आम आदमी पार्टीमध्ये काम करण्याची इच्छा असणारे सामाजिक राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे स्वागत स्वागत आहे तसेच आम आदमी पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना बैठकीस उपस्थित राहणे अनिवार्य असेल

## श्री श्री रविशंकर बाल मंदिर आदर्श नगर व श्री श्री रविशंकर विद्यामंदिर, पिंपरगव्हाण रोड येथे लोकमान्य टिळक जयंती साजरी

बीड (प्रतिनिधी)-श्री श्री रविशंकर बाल मंदिर, आदर्श नगर व श्री श्री रविशंकर विद्यामंदिर पिंपरगव्हाण रोड बीड येथे आज दिनांक 23 जुलै 2024 वार मंगळवार रोजी लोकमान्य टिळक यांच्या जयंतीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सदस्य श्री जैन सर, संस्थेचे सचिव श्री पारगावकर सर, शाळेचे मुख्याध्यापक श्री हंसेसर, शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम यांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले. इयत्ता चौथी वर्गातील स्वानंदी व इयत्ता आठवी वर्गातील श्लोक लखोटिया या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांचा जीवन परिचय आपल्या भाषणातून करून दिला. कार्यक्रमात पुढे विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळकांच्या जीवन कार्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. आपले मनोगत व्यक्त करतांना शाळेच्या उपमुख्याध्यापिका अनिता सुर्यवंशी मॅडम म्हणाल्या की, लोकमान्य टिळक यांनी संपूर्ण जीवन देशासाठी अर्पण केले. लोकमान्य टिळकांसारखे गुण, त्यांच्यासारखे देशप्रेम विद्यार्थ्यांनीही स्वतःमध्ये निर्माण करावेत असे विचार प्रकट केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पूजा लांडे मॅडम यांनी केले सांस्कृतिक विभाग प्रमुख शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे नियोजन करून हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.





## सर्वसामान्यांना दिलासा ;विकसित भारत संकल्पनेला बळ
## पंतप्रधानांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास ठरविला सार्थ

## नवरत्न अर्थसंकल्पात युवा भारताचे प्रतिबिंब मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रीया

मुंबई, दि. २३: कररचनेत मोठे बदल करून सर्वसामान्यांना दिलासा देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोट्यवधी देशवासियांचा विश्वास सार्थ ठरविला. केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प शेतकरी, महिला, युवा, कौशल्य विकास, रोजगार, पायाभूत सुविधांची उभारणी, शहरांचा विकास अशा विविध नऊ घटकांवर लक्ष केंद्रीत करणारा नवरत्न अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच युवकांच्या कल्याणासाठी भरीव तरतूद, रोजगाराला चालना देणारा आणि विकसीत भारत संकल्पनेला बळ देणारा असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे सांगितले.

शेतकऱ्यांना बळ

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग सातव्यांदा आज केंद्रीय अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करीत मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, गरीब, महिला, युवा, शेतकरी या घटकांवर भर देतानाच कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटींची तरतूद तसेच शेती क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्यासाठी डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा निर्णय हा कृषी क्षेत्राबरोबरच शेतकऱ्यांना बळ देणारा आहे. त्याचबरोबर एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा काळाची गरज असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाने देखील महाराष्ट्रात नैसर्गिक शेतीला चालना देण्यासाठी पावले उचलल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

नविन कररचना ही सामान्यांना, नोकरदारांना दिलासा देणारी असून त्याचे मी स्वागतच करतो. या नव्या कररचनेमुळे करदात्यांची संख्याही वाढेल. यातून विकासाला



आवश्यक असणारे करसंकलनातही महाराष्ट्रात अग्रेसर राहील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

ग्रामीण भागाचा कायापालट

या अर्थसंकल्पात शेती क्षेत्रातील उत्पादकता, रोजगार व कौशल्य विकास, मनुष्यबळ विकास व सामाजिक न्याय, उत्पादन व सेवा, शहरी विकास, उर्जा संरक्षण, पायाभूत संरचना, संशोधन व विकास, नव्या पीढीतील सुधारणा या नऊ घटकांचा प्रामुख्याने विचार करण्यात आल्याने सर्वसमावेशक असा हा अर्थसंकल्प असल्याचे सांगत ग्रामीण भारताच्या विकासासाठी केलेली २.६६ लाख कोटी रुपयांची तरतूद खेड्यांचा कायापालट करणारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

५० लाख अतिरिक्त रोजगार

आपला देश युवांचा आहे असे नेहमी म्हटले जाते. त्याचे प्रतिबिंब आजच्या अर्थसंकल्पात पहायला मिळाले असून युवा वर्गासाठी मोठ्या प्रमाणात तरतुदी करण्यात आल्या आहेत पहिल्यांदाच रोजगारासाठी तयार झालेल्या युवकांना एक महिन्याचा भत्ता पहिल्या महिन्यात देण्याचा निर्णय हा युवांसाठी दिलासा देणारा आहे. ५० लाख अतिरिक्त रोजगार निर्माण करण्याचा देखील निर्धार अर्थसंकल्पातून करण्यात आला आहे. यामुळे महाराष्ट्रातील युवकांनाही रोजगाराची मोठी संधी निर्माण होणार आहे. देशातील ५०० अग्रणी कंपन्यांमध्ये युवकांना इंटर्नशिप संधी मिळणार असून पाच वर्षांत सुमारे एक कोटी तरुणांना याचा फायदा होणार आहे. कौशल्य विकासासाठी जाहिर केलेल्या नवीन योजनेद्वारे राज्य सरकार व उद्योगविश्व यांच्या संयुक्त विद्यमातून ५ वर्षांच्या काळात २० लाख युवकांना कौशल्यविकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मुद्रा योजनेतून दुप्पट कर्ज देण्याचा निर्णयही युवांना सक्षम करणारा आहे.

पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी

अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या निर्माणासाठी देखील भरीव तरतूद करण्यात आला आहे. देशात पायाभूत सुविधा उभारणी कामात महाराष्ट्र अग्रेसर आहे. अर्थसंकल्पात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी ११ लाख कोटींची भांडवली तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय पायाभूत सुविधांमध्ये होणाऱ्या खासगी गुंतवणुकीला सरकारी धोरणांमधून प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांच्या कामांना अधिक पाठबळ मिळेल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे. देशभरात रस्तेबांधणीसाठी २६ हजार कोटींचा खर्च केला जाणार असल्याने दळणवळणाचे जाळे मजूबत होणार आहे. देशभरात १२ इंडस्ट्रियल पार्कला नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट प्रोग्रॅमअंतर्गत मंजुरी देण्याचा निर्णय हा उद्योगक्षेत्राला भरारी देणारा आहे. देशभरातील २५ हजार गावांसाठी चांगल्या दर्जाचे रस्ते बनवण्यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजना टप्पा ४ सुरू करण्याचा निर्णय महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या विकासासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे. पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजनेद्वारे सौर ऊर्जेला चालना मिळणार असून अर्थसंकल्पातील तरतुदी आणि योजनांमुळे महाराष्ट्राच्या विकासात मोठी भर होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

०००००

# बीड जिल्हयात बाल विवाह निर्मूलन मोहिमे अंतर्गत पाली येथे कार्यक्रम संपन्न

बीड, 23 : बीड जिल्ह्यात बाल विवाह निर्मूलन मोहिमे अंतर्गत बाल विवाह थांबविण्यासाठी विविध जन जागरूती पूर्ण कार्यक्रम केले जात आहे. याचा अंतर्गत पाली येथील जिल्हा परिषदेच्या माध्यामिक विद्यालयात बाल विवाह निर्मुलनपर जनजागृती कार्यक्रम आयोजित केला गेला. हा कार्यक्रम शनिवारी जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय व युवराज शंभुराजे सेवाभावी संस्था बीड यांच्या संयुक्तपणे जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय , पाली येथे आयोजित करण्यात आला होता.

आयोजित केलेल्या कार्यक्रमात बाल विवाह कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाहाचे आयोजन करणे, साखरपुडा करणे, लग्नाची बोलणी करणे, किंवा



बाल विवाहाला प्रोत्साहन भेटल अशी कोणतेही कृती करणे याकरिता वधु व वर यांचे आई वडील, मामा मामी, इतर नातेवाईक भटजी, मंडपवाले, सजावटवाले, फोटो ग्राफर, पाणीवाले, आचारी, व-हाडी मंडळी या सर्वावर बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम 2006 मधील कलम 9, 10,11 मधील तरतूदी प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात येतो. बालविवाह विषयी गुपित माहिती देण्यासाठी चाईल्ड हेल्पलाईन (१०९८) क्रमांकाचा उपयोग करावा, अशी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, बाल संगोपन योजना, अनाथ मुलांसाठी प्रमाणपत्र, लेक लाडकी योजना या सर्व योजनांचे स्वरूप, या योजनांसाठी कोण पात्र किंवा अपात्र आहेत, योजनांसाठी लागणारे कागदपत्रे, अर्ज भरण्याची प्रक्रिया संदर्भात विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. सर्व गरजू मुला मुलींनी आणि त्यांच्या कुटुंबानी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

यावेळी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, मंगेश जाधव, जिल्हा समन्वयक चाईल्ड हेल्पलाईन(१०९८) अश्विनी जगताप, सुपरवायझर प्रसाद पवार, सुपरवायझर प्रवीण वीर, स्वयंसेवक स्वप्नील कोकाटे तसेच जिल्हा परिषद माध्यमिक विद्यालय, पाली येथील मुख्याध्यापक लाड.के.एस यांनी आणि शिक्षक मुंडे. एम. एस, राठोड. आर.एम, आघव.आर.डी, म्हेत्रे.आर.एस कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित होते.

# जालन्यात तरुणाला भरदिवसा लुटणाऱ्या दोन चोरट्यांच्या २४ तासात मुसक्या आवळल्या कदीम जालना पोलिसांची कामगिरी

**जालना/प्रतिनिधी**

जालन्यात तरुणाला भरदिवसा लुटणाऱ्या दोन चोरट्यांच्या कदीम जालना पोलिसांनी २४ तासात मुसक्या आवळल्या असून पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जालना तालुक्यातील अंतरवाला येथील तरुण गणेश सुखदेव शिरसाठ (वय ३३ वर्षे) हा रविवारी दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास जुना जालना भागातील नूतन वसाहत येथील भाजीमंडीतून भाजीपाला खरेदी करून परत जाण्यासाठी अंबड रोडवर येऊन थांबला होता. यावेळी गणेश शिरसाठ हे मोबाईलवर बोलत असताना त्याठिकाणी दोन इसम आले, त्यापैकी एकाने त्यांचा मोबाईल हिसकावून घेतला. त्यांनतर दुसऱ्या इसमाने त्यांना बेदम मारहाण करून, त्यांच्या खिशातील पाकीट हिसकावून घेतले. त्यांनतर चोरट्यांनी घटनास्थळावरून पलायन केले. या घटनैत चोरट्यांनी गणेश शिरसाठ यांच्या पाकिटासह रोख २ हजार रुपये, एटीएम कार्ड, पॅन कार्ड, आधारकार्ड, यासह ६ हजाराचा मोबाईल, असा एकूण ८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून, पोलिसांनी तपासचक्रे फिरविली आणि अवघ्या २४ तासात आरोपींना जेरबंद केले. अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीमध्ये ईश्वर राम घाटोळे (वय २०, रा. नूतन वसाहत) आणि ऋषिकेश दीपक कांबळे (वय २३, टीव्ही सेंटर, जालना) यांचा समावेश असून, त्यांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस अधीक्षक अजय बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे, पोहेकॉ. सदा राठोड, बाबा गायकवाड, दिलीप गायकवाड, बलराम जारवाल आदींनी ही कामगिरी केली.

# बँक ऑफ बडोदा तर्फे वृक्षारोपण व मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप.



उरण/विठ्ठल ममताबादे

भारतातील अग्रगण्य असलेल्या बँक ऑफ बडोदाच्या ११७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून बँकिंग क्षेत्रात प्रसिद्ध असलेल्या बँक ऑफ बडोदा शाखा आनंदनगर तर्फे उरण मध्ये वृक्षारोपण करण्यात आले तसेच स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान स्कूल बोरी येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त बँक ऑफ बडोदा ने संपूर्ण भारतात विविध सामाजिक शैक्षणिक पर्यावरणपूरक उपक्रम राबविले आहेत.बँक ऑफ बडोदा ही भारतातील विश्वसनीय, गुणवत्तापूर्ण अशी बँक असून सदर बँक ग्राहकांना तत्पर सेवा देण्यास कटीबद्ध असल्याचे बँक ऑफ बडोदा आनंद नगर शाखा उरणचे ब्रँच मॅनेजर ओमप्रकाश सिंग यांनी यावेळी सांगितले.बँकेचे कर्मचारी मोजेस कोळी या प्रसंगी उपस्थित होते.बँक ऑफ बडोदा मध्ये वर्धापन दिन साजरा करून बँक ऑफ बडोदा तर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आल्याने नागरिकांनी सदर उपक्रमाचे कौतुक केले.

# राज्यात सरासरीच्या १२३ टक्के पाऊस; पेरण्या समाधानकारक

**पुणे/प्रतिनिधी**

राज्यात सरासरीच्या १२३.२ टक्के पाऊस झाला असून पेरण्या देखील समाधानकारक झाल्या आहेत. या संदर्भातील सादरीकरण आज कृषी विभागाने मंत्रिमंडळ बैठकीत केले. राज्यात २२ जुलैपर्यंत ५४५ मि.मी. पाऊस झाला आहे. मागील वर्षी याच सुमारास ४२२ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या ९५.४ टक्के पाऊस झाला होता. राज्यात खरीपाचे ऊस वगळून १४२.२ लाख हेक्टर क्षेत्र असून आतापर्यंत १२८.९४ लाख हेक्टर क्षेत्रावर (९१ टक्के) पेरणी झाली आहे. भात व नाचणी पिकाची पुर्नलागवड कामे सुरु असून ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन, तूर, उडीद, मूग, भुईमूग आणि कापसाच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत. खत आणि बियाणांची पुरेशी उपलब्धता आहे.



पाणी साठा : सध्या राज्यातील सर्व धरणांमध्ये ३९.१७ टक्के पाणी साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ४३.६५ टक्के पाणी साठा होता. सर्वात कमी म्हणजे १२.१३ टक्के पाणी साठा छत्रपती संभाजीनगर येथे तसेच २८.३४ टक्के नाशिक येथे आहे. राज्यातील १ हजार २१ गावे आणि २ हजार ५१८ वाड्यांना १ हजार ३६५ टँकर्सद्धारे पाणीपुरवठा सुरु आहे. टँकर्सची संख्या ३२६ ने वाढली आहे.

# रांजणी यैथील श्री सभु प्रशालेत लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**जालना/प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत मंगळवारी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाप्रसंगी थोर क्रांतिकारक चंद्रशेखर आजाद यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष गौतमभाऊ देशमुख हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक




मधुकर बिरहारे, ज्येष्ठ शिक्षक अतुल हेलसकर यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेचे पुष्पहार वाहून पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थी कु. प्रतीक्षा कारेगावकर, अभय देशमुख या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक यांचे जीवन व समाज परिवर्तनासाठी त्यांचे योगदान याविषयीचे विचार मांडले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रशालेचे मुख्याध्यापक मधुकर बिरहारे यांनी लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्य लढा उभारण्यासाठी गणेशोत्सव, शिवजयंती सारखे उत्सव सुरू केले. लोकांना एकत्र आणून ब्रिटिश शासनाला शह दिला आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी योगदान दिले. आम्ही स्वतः गणेश मंडळाच्या माध्यमातून सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करतो. त्यात वृक्ष संवर्धनासाठी कार्य चालवले आहे. शिवाय विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करावे. असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात गौतमभाऊ देशमुख यांनी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात समाजाला एकत्र आणण्यासाठी केली. गणेशोत्सव काळात प्रबोधनपर व्याख्याने, सार्वजनिक स्वच्छता असे उपक्रम उत्सव म्हणून मानले जावेत, अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमास इयत्ता दहावी वर्गातील सर्व विद्यार्थी, वर्गशिक्षक सतीश लंगोटे, सहशिक्षक विष्णू पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अक्षरा लिखे हिने केले. तर आभार सिद्धेश्वर कदम याने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी व वर्ग शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## अमोल मिटकरींची भाजपच्या ४ बड्या मंत्र्यांच्या कामकाजांवर टीका, महायुतीत सारं काही आलबेल आहे ना?

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह भाजपचे 4 मंत्री काही कामाचे नाहीत, असं म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अमोल मिटकरी यांनी सरकारलाच घरचा आहेर दिला आहे. गेल्या 6 महिन्यांपासून अकोल्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील जिल्ह्यात फिरकले सुद्दा नाहीत. त्यांनी फोनही घेतला नसल्याचं मिटकरींनी म्हटलं आहे. त्यांच्या या आरोपांमुळे एकच खळबळ उडाली आहे. महायुतीत सारं काही आलबेल नाही? अशी चर्चा आता रंगू लागली आहे. विशेष म्हणजे अजित पवार यांचे निकटवर्तीय मानले जाणारे आमदार अण्णा बनसोडे यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते तथा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी माजी केंद्रीय मंत्री शरद पवारांवर केलेल्या टीकेवर नाराजी व्यक्त केली होती. यानंतर आता अमोल मिटकरी यांनी उघडपणे भाजपच्या चार बड्या मंत्र्यांच्या कामकाजांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. विशेष म्हणजे या सगळ्या घडामोडी विधानसभा निवडणुकीच्या आधी घडत आहेत. महाराष्ट्राच्या विकासासाठी सत्तेत गेलो म्हणणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटातून आता भाजपच्या मंत्र्यांच्या कारभारावरुन गंभीर आरोप होत आहेत. अजित पवार गटाचे आमदार अमोल मिटकरींनी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाममंत्री रविंद्र चव्हाण आणि कामगार मंत्री सुरेश खाडे हे भाजपचे चारही मंत्री काहीही कामाचे नसल्याचं म्हटलं आहे.




अमोल मिटकरी नेमकं काय म्हणाले?

“गेल्या 6 महिन्यांपासून विखे अकोल्यात फिरकले सुद्धा नाहीत. शेती, जिल्ह्यातली पूरस्थिती, कापूस आणि सोयाबीनच्या समस्या विखेंच्या कानावर घालायच्या होत्या. याआधी त्यांना पर्सनलवर कॉल केला, तो नंबर डायव्हर्ट होवून त्यांच्या घरी लागला. नंतर विखेंच्या दुसऱ्या नंबरवर कॉल करुनही उत्तर मिळालं नाही. विखेंचे पीए आणि ओएसडींकडून प्रतिसाद आला नाही. सत्तेतले राष्ट्रवादीचे मंत्री सर्वांना प्रतिसाद देतात, पण भाजपचे मंत्री आम्हाला प्रतिसाद का देत नाहीत? ठाकरे बाहेर पडत नव्हते, म्हणून भाजप टीका करते, पण आता कोरोना नसतानाही मंत्री बाहेर का पडत नाहीत?”, असं मिटकरींनी म्हटलं आहे. सत्तेत जाताना लोकांच्या कामासाठी आपण सत्तेत गेल्याचं अजित पवार गटानं म्हटलं होतं. तर भाजपने अजितदादांमुळे आता सरकार ट्रिपल इंजिन बनल्याचा दावा केला होता. मात्र सत्तेतील मंत्री सत्ताधारी आमदारांचेच फोन उचलत नसल्याचं खुद्द सरकारमधल्याच नेत्याला जाहीरपणे ट्विट करावं लागणं, हे मंत्र्यांच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करणारं आहे.

# नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी साठी शरदचंद्र महाविद्यालय सज्ज

**नायगाव /प्रतिनिधी**


शरदचंद्र महाविद्यालयामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. हरीबाबू यांनी पत्रकार परिषद घेऊन नवीन शैक्षणिक धोरणाची सविस्तर माहीती दिली. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमाची आखणी केली असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याची शक्यता आहे. पदवीचे शिक्षण हे आता चार वर्षाचे असून पहिल्या वर्षी सर्टिफिकीटचे प्रमाणपत्र मिळेल, दुसऱ्या वर्षी डिप्लोमा प्रमाणपत्र मिळेल, तिसऱ्या वर्षी डिग्रीचे प्रमाणपत्र मिळेल तर चौथ्या वर्षी ऑनर्स प्रमाणपत्र दिले जाते पण या चार वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमात एखाद्या वर्षी विद्यार्थ्याने गॅप केल्यास कोणतेही नुकसान त्याचे होत नाही त्या त्या वर्षाचे प्रमाणपत्र मिळाल्याने माझे शिक्षण अर्ध्यावरच थांबले असे होत नाही याशिवाय कला शाखेतील विद्यार्थी कॉमर्स व सायन्स शाखेतील कोणताही विषय घेऊन शिक्षण घेऊ शकतो तसेच बाहेरच्या विद्यापीठातील एखादा विषय घेऊन अभ्यास जरी केला तरीही त्या विषयाचे क्रेडीट त्यांच्या नावावर जमा होतात अशा पद्धतीने सविस्तर मार्गदर्शन प्राचार्य डॉ.हरीबाबू यांनी करून पत्रकारांनी उपस्थित केलेल्या शंकेचे निरासनदेखील अतिशय सोप्या पध्दतीने केले. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाविद्यालय पूर्णपणे तयारी केल्याचेही त्यांनी सांगितले. महाविद्यालयामध्ये नवीन सुविधा ज्यामध्ये सोलार युनिट, फिल्टर पाण्याचे मशिन, कम्प्यूटर्स, फॅन्स, बेंचेस, रंगरंगोटी, स्वच्छता अशा अनेक बाबीबरोबरच सर्टीफिकेट कोर्सेस, एमओयू, नवीन विषयाची सुरुवात, संशोधन केंद्र सुरू करून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणीसाठी आमचे महाविद्यालय सज्ज असल्याचे सांगितले. उपप्राचार्य डॉ. शाम पाटील यांची विशेष उपस्थिती होती. सर्टीफिकेट कोर्सपैकी मास मेडिया, जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन पुर्ण केलेल्या विद्यार्थ्याना जेष्ठ पत्रकाराच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.यावेळी अनेक वर्तमानपत्राचे पत्रकार, इलेट्रॉनिक माध्यमाचे प्रतिनिधी उपस्थित होते.विशेषतः भा. ग. मोरे, वहाबोद्दीन शेख, सुर्यकांत सोनखेडकर, प्रभाकर लखपत्रेवार, रघुनाथ सोनकांबळे. संपादक डॉ. शंकर गड्डमवार, संपादक प्रकाश हणमंते, दिलीप वाघमारे.लक्ष्मण बरगे .रामप्रसाद चन्नावार. माधव चव्हाण, आरीफ शेख, शंकर बोईनवाड, बाळासाहेब पांडे. गंगाधर गंगासागरे. माधव बैलकवाड,मेडीयाचे प्रतिनिधी तानाजी शेळगावकर, शेषराव कंधारे. गोविंद नरसीकर. हणमंत चंदनकर. मधुकर जवळे. शिवाजी कुंटूरकर. गणेश कंदूरके. प्रल्हाद भंडारे . निळकंठ जाधव.यांच्यासह 31 प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रकाश हिवराळे यांनी केले तर आभास नॅकचे समन्वयक डॉ. वैभव कवडे यांनी मानले. परिषद यशस्वीतेसाठी ग्रंथपाल डॉ. भरत लोकलवार, डॉ अमित पांडे, उमेश चव्हाण , बालाजी काळे, देविदास भाकरे यांनी परिश्रम घेतले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
बुधवार २४ जूले २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# अर्थसंकल्पाचा सराफा बाजारावर परिणाम; सोने-चांदीचे दर हजारो रुपयांनी कोसळले

आज देशाचा अर्थसंकल्प सादर झाला. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला. यात विविध सेक्टरसाठी घोषणा करण्यात आल्या आहेत. आज सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा सराफा बाजारावर मोठा परिणाम झाला आहे. अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सोने- चांदीचा भाव हजारो रूपयांनी कोसळला आहे. सोन्या चांदीचे दर तब्बल तीन हजारांनी घसरले आहेत. त्यानंतर ग्राहकांनी सोन्या- चांदीच्या दुकानात मोठी गर्दी केली आहे. जळगावच्या सराफ बाजारात ग्राहकांची गर्दी उसळली आहे. इतक्या हजारांनी घसरला सोन्याचा दर देशाचा अर्थसंकल्प आज सादर झाला. यात दागिन्यांवरील कस्टम ड्युटी सहा टक्क्यांनी कमी करण्यात आली आहे. यामुळे सोन्याचा भाव कमी झाला आहे. जळगावच्या सराफ बाजारात सोन्या-चांदीच्या दर तब्बल तीन हजार रुपयांनी घसरले आहेत. सोन्या चांदीच्या दरात घसरण झाल्याच्या बातमीनंतर जळगावच्या सराफ बाजारात सोने चांदीचे दागिने खरेदीसाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केली आहे. जळगावात किती आहे सोन्याचा दर? देशाच्या अर्थसंकल्पात सोन्या व चांदीवरील कस्टम ड्युटी सहा टक्क्यांनी



कमी केल्याची घोषणा झाल्यामुळे जळगावच्या सुवर्णन नगरीत सोन्या-चांदीचे दर घरसले आहेत. जळगावच्या सराफा बाजारात सोन्याच्या दरात तीन हजार रुपयांनी तर चांदीच्या दरातही तीन हजार रुपयांनी घसरण झाली आहे. सोन्याचे दर 73 हजार रुपयांवरून 70 हजार रुपयांवर पोहोचले आहेत. तर चांदीचे दर हे 90 हजार रुपयांवरून 87 हजार रुपयांवर पोहोचले आहेत.

ग्राहकांमध्ये आनंदाचं वातावरण

गेल्या एक ते दीड महिन्यानंतर तब्बल 3 हजार रुपयांनी सोन्या चांदीचे दर घसरल्यामुळे ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. तब्बल तीन हजार रुपयांनी दर घसरल्यामुळे मोठा आनंद होत असल्याच्या महिला ग्राहकांनी भावना व्यक्त केल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून बजेटमध्ये नसलेलं सोनं आता मात्र ग्राहकांना थोड्या कमी दरात मिळत आहे. हे सोनं आता बजेटमध्ये आल्याने सोनं खरेदी करताना आनंद होत असल्याची प्रतिक्रिया ग्राहकांनी व्यक्त केलीय. गेल्या काही दिवसांपासून सोन्या-चांदीच्या दारात चढ-उतार होत असल्याने सराफ व्यावसायिक तसेच ग्राहक संभ्रमात होते. मात्र आता तब्बल तीन हजार रुपयांनी सोन्याने चांदीचे दर कमी झाल्यामुळे त्याचा ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. सोन्या चांदीचे भाव पुन्हा वाढण्याची शंका असल्यामुळे ग्राहकांनी आजच सोनं खरेदीसाठी केली सराफाच्या दुकानांमध्ये गर्दी केली आहे.

# हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेले रोडागिरी बाबांच्या यात्रेला गुरुवार पासून सुरुवात

आष्टी तालुक्यातील हिवरा डोंगरगण,दादेगाव,भोजेवाडी या गावचे श्रद्धास्थान आणि ग्रामदैवत रोडागिरी बाबांचा यात्रा उत्सव गुरुवार दिनांक २५जुलै रोजी उत्साहात संपन्न होत आहे निसर्गमय परिसरात असलेले सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान व जागृत देवस्थान असलेल्या रोडागिरी बाबांच्या दर्गावर दर्शनासाठी मुंबई पुणे अहमदनगर तसेच तालुक्यातून मोठ्या संख्येने भावी हजेरी लावतात गावभरातुनभाविकांसाठी दिवसभर प्रसाद वाटप करण्यात येतोजागृत



देवस्थान म्हणून भाविक या ठिकाणी नवस करतात पूर्वी एकेश्वर वादाचा प्रचार आणि प्रसार करत भारतभर भ्रमण करणाऱ्या सोपी संतां पैकीच रोडागिरी बाबा हे होते त्यांचे बंधू कड्याचे मौलाली बाबा धामणगावचे सय्यद बादशहा बाबा ठीक देवस्थाने ही आष्टी तालुक्यात प्रसिद्ध आहेत त्या ठिकाणी पुरातन दर्गाह वास्तुशास्त्राचा उत्कृष्ट नमुना पाहायला मिळतो यात्रेच्या पार्श्वभूमीवर दर्गाह आणि परिसरात विद्युत रोशनाई करण्यात येते तसेच पार्किंग व्यवस्था ही करण्यात आली होती त्या दुपारी पाऊसाने हजेरी लावली की रस्त्यावरून वाहनांना परतताना मोठी कसरत करावी लागली सर्व धर्मीय भाविकांनी मोठ्या उत्साहात आणि शांततेत यात्रेचा आनंद घेतात.

## अलिबाग विरार कॉरीडॉर शेतकरी संघर्ष समिती उरणच्या पदाधिकाऱ्यांनी रायगडचे जिल्हाधिकाऱ्यांची घेतली भेट.
# 225 हरकती केल्या दाखल.

अलिबाग विरार कॉरीडॉर शेतकरी संघर्ष समिती उरणच्या पदाधिकाऱ्यांनी रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे यांची भेट घेवून शेतकऱ्यांच्या विविध समस्या त्यांच्यासमोर मांडल्या .व शेतकऱ्यांच्या वतीने शेतकरी कमी भावात जमिनी देणार नाहि हे ठाम पणे सदर पदाधिकारी, शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना सांगितले.




शेतकऱ्यांच्या लेखी २२५ हरकती दाखल करण्यात आले.यावेळी अध्यक्ष संतोष ठाकूर,सचिव रवि कासूकर, वसंत मोहीते, खजिनदार महेश नाईक, राजाराम जोशी,रमण कासकर आदी समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. सदर भेटी दरम्यान चर्चा करून बैठकि साठि लेखी निवेदन जिल्हाधिकारी यांना शेतकऱ्यांनी दिले.

# सरपंचांनी भ्रष्टाचार केल्यास तुरुंगवारी अपहाराच्या तक्रारींची संख्या पाहता शासनाने निर्गमित केला निर्णय

**मुंबई/ प्रतिनिधी** सरपंच गावाचा प्रथम नागरिक असण्याबरोबरच गाव पुढारीही असतो. गावाच्या विकास कामात भ्रष्टाचार होत असून, त्यात सरपंच केंद्रस्थानी राहत असल्याच्या अनेक तक्रारी शासन प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत यामुळे सरपंच पदाची प्रतिमा मलीन होत आहे सरपंचाने भ्रष्टाचार केल्यास आता थेट तुरुंगाची हवा खावी लागणार आहे तसा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्यासंदर्भात आदेशही काढण्यात आले आहेत. गावोगावी ग्रामपंचायतीं कडून शासकीय योजना राबवीत असताना भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत असे प्रकार गंभीर स्वरुपाचे असल्याने प्रशासनाने आता फौजदारी कारवाईबरोबरच अपहार केलेली रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले आहेत या गुन्ह्यात जबाबदार संबंधित सरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक, लिपिक, कर्मचारी यापैकी कोणीही अथवा सर्वजण चौकशी अंती दोषी आढळल्यास संबंधित पंचायत




समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे सरपंच आणि ग्रामसेवक या कर्तव्यदक्ष अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या संगनमताने बीड जिल्ह्यातील अनेक गावांची वाट लागल्याच्या तक्रारी शासन दरबारी दाखल झाल्या आहेत राज्य सरकारचा विविध प्रकारचा निधी आता थेट ग्रामपंचायतींना येत असल्याने. निधीचा गैरवापर होण्याचे प्रकार वाढत असल्याच्या हजारावर तक्रारी झाल्या आहेत ग्रामविकास विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत एक महिन्यात चौकशी करावी विभागीय चौकशीत गुन्हा घडल्याबाबत निष्कर्ष काढण्यात आल्यास संबंधितांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच ज्या प्रकरणात कोणतीही चौकशी झालेली नाही अशा प्रकरणी संबंधित पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी प्राथमिक चौकशी करावी चौकशी एक महिन्यात पूर्ण करून अहवाल सादर करणे अनिवार्य असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे एखाद्या ग्रामपंचायतीतील ग्रामसेवकाने नोकरी लागल्यापासून नोकरीच्या १० वर्षांनंतर भ्रष्टाचार केला असेल तर त्याच्या नोकरीच्या पहिल्या दिवसापासून तपास करण्याबाबतचा निर्णयदेखील ग्रामविकास मंत्रालयाने घेतला असल्याने प्रशासनातील सर्व अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे



पाटण तालुक्यातील सडावाघापूरचा उलटे धबधबे वाहू लागला आहे. धबधब्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे. जोरदार पाऊसचे पाणी डोंगरावरुन खाली जाताना पुन्हा वर येते. हे नयनरम्य दृश्य पाहण्यासारखे असते.

# पुण्यातील या २९ बोगस शाळा, १३ शाळांप्रकरणी गुन्हा दाखल,

पुण्यातील 29 बोगस शाळांना लागणार टाळे लागणार आहे. शिक्षण विभागाने या 29 बोगस शाळांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे तर 13 शाळांवर गुन्हा दाखल केला आहे.पुणे महानगर पालिकेच्या शिक्षण मंडळाने बोगस शाळांची आकडेवारी जाहीर केली आहे. पुण्यातील शिक्षण विभागान यंदा बोगस शाळांची आकडेवारी जाहीर केली आहे. या शाळांमध्ये काही गेल्या वर्षीच्या शाळांची नावे आली आहेत. त्यामुळे या शाळांची पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.पुण्यालगतच्या हवेली आणि मुळश तालुक्यात सर्वाधिक बोगस शाळा आहेत असे तपासणीत आढळले आहे. शाळेच्या व्यवस्थापनान या शाळेतील पालकांना सोयीचे ठरण्यासाठी गावातील प्रमुख चौकात शाळांची उभारणी केलेली आहे. प्रत्यक्षात शाळेचे कार्यालय भलत्याच ठिकाणी असल्याचे उघडकीस आले आहे. अनेक शाळा व्यावसायिक इमारतीत आहेत त्यांना मैदान नाही. तसेच काही शाळा चौथीपर्यंत मंजूरी मिळालेली असताना पुढील वर्ग सुरु असल्याचे उघडकीस आले आहे. तर काही शाळांमध्ये कनिष्ठ वर्गाची परवानगी असताना पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक वर्ग बिनदिक्कत सुरु असल्याचे उघडकीस आले आहे. अनधिकृत शाळांची यादी जाहीर करण्यास उशीर झाला असल्याने आता या शाळेत शिक्षणसत्र सुरु असलेल्या पालकांचे धाबे दणादणे आहेत. परंतू विद्यार्थ्याचे कोणतेही नुकसान होणार नसल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com